म. ग्रं. सं. ठाणें
८१३
विषय काव्य
सं. नं. ~~३९०५~~

३८० काव्य.

म. ग्रं. सं. ठाणें

विषय काव्य

हालय क्रमांक ~~३८०~~ ८८३

लेखक

सन १८९३

पुस्तकाचें नांव रामदासी वेचे

श्री भजाव.

# रामदासी बोध.

मना सज्जना भक्तिपंथेंचि जावें,
तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावें;
जनीं निंद्य तें सर्व सोडोनि द्यावें,
जनीं वंद्य तें सर्वभावें करावें. १

प्रभाते मनीं राम चिंतीत जावा;
पुढें वैखरी, राम आधीं वदावा;
सदाचार हा थोर सांडूं नको तो,
जगीं तोचि तो मानवी धन्य होतो. २

मना वासना दुष्ट कामा नये रे;
मना सर्वथा पापबुद्धी नको रे;
मना सर्वथा नीति सोडूं नको हो;
मना अंतरीं सार वीचार राहो. ३

मना पापसंकल्प सोडोनि द्यावा,
मना सत्यसंकल्प जीवीं धरावा;
मना कल्पना ते नको वीषयाची,
विकारें घडे हो जनीं सर्व छी छी. ४
मना श्रेष्ठ धारिष्ट जीवीं धरावें,
मना बोलणें नित्य सोसीत जावें,
स्वयें सर्वदा नम्रवाचे वदावें,
मना सर्व लोकांस रे नीववावें. ५
देहे त्यागितां कीर्ति मागें उरावी,
मना सज्जना हेचि क्रीया धरावी;
मना चंदनाचे परी त्वां झिजावें,
परी अंतरीं सज्जना नीववावें. ६
सदासर्वदा प्रीति रामीं धरावी,
दुखाची स्वयें सांड जीवीं करावी;
देहेदुःख तें सूख मानीत जावें,

काव्य ९८३



विवेकें सदा स्वस्वरूपीं भजावें. ७

जनीं सर्वसूखी असा कोण आहे?
विचारीं मना तूंचि शोधोनि पाहें;
मना त्वांचि रे पूर्वसंचीत केलें,
तयासारिखें भोगणें प्राप्त झालें. ८

मना सांग पां रावणा काय झालें?
अकस्मात तें राज्य सर्वे बुडालें;
ह्मणोनी कुडी वासना सांडि वेगीं,
बळें लागला काळ हा पाठिलागीं. ९

जिवा कर्मयोगें जनीं जन्म झाला,
परी शेवटीं काळ घेऊनि गेला;
महा थोर ते मृत्युपंथेंचि गेले,
असंख्यात ते जन्मले आणि मेले. १०

मना पाहतां सत्य हे मृत्युभूमि,
जितां बोलती सर्वही जीव मी मी;

चिरंजीव ते सर्वही मानिताती,
अकस्मात सोडूनिया सर्व जाती. १
मरे एक त्याचा दुजा शोक वाहे,
अकस्मात तोही पुढें जात आहे;
पुरेना जनीं लोभ रे, क्षोभ होतो,
ह्मणोनी जनीं मागुती जन्म घेतो. १२
मना सर्वथा सत्य सांडूं नको रे,
मना सर्वथा मिथ्य मांडूं नको रे;
मना सत्य तें सत्यवाचे वदावें,
मना मिथ्य तें मिथ्य सोडोनि द्यावें. १३
मना वीट मानूं नको बोलण्याचा;
पुढें मागुता राम जोडेल कैंचा?
सुखाची घडी लोटतां दुःख आहे;
पुढें सर्व जाईल कांहीं न राहे. १४
देहेरक्षणाकारणें यज्ञ केला,

काव्य ९८३



परी शेवटीं काळ घेऊनि गेला;
करीं रे मना भक्ति या राघवाची,
पुढें अंतरीं सोड चिंता भवाची. १५
दिनानाथ हा राम कोदंडधारी
पुढें देखतां, काळ पोटीं थरारी;
जनीं वाक्य नेमस्त हें सत्य मानीं,
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी. १६
समर्थाचिया सेवका वक्र पाहे,
असा सर्व भूमंडळीं कोण आहे?
जयाची लिला वर्णिती लोक तीन्हीं,
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी. १७
महासंकटीं सोडिले देव जेणें,
प्रतापें बळें आगळा कोटिगूणें,
जयातें स्मरे शैलजा शूलपाणी,
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी. १८

अहल्या शिळा राघवें मुक्त केली,
पदीं लागतां दिव्य होवोनि गेली;
जया वर्णितां शीणली वेदवाणी,
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी. १९
वसे मेरुमांदार हे सृष्टिलीला,
शशीसूर्य तारांगणें मेघमाळा;
चिरंजीव केले जगीं दास दोन्ही,
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी. २०
सदा सर्वदा देव सन्नीध आहे,
कृपाळपणें अल्प धारिष्ट पाहे;
सुखानंद आनंदकैवल्यदानीं
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी. २१
असे हो जया अंतरीं भाव जैसा,
वसे हो तया अंतरीं देव तैसा,
अनन्यासि रक्षीतसे चापपाणी,

नुपेक्षी कदा राम दासाभिमानी. २२
सदा चक्रवाकासि मार्तंड जैसा
उडी घालितो, संकटीं स्वामि तैसा;
हरीभक्तिचा घाव घालीं निशाणीं;
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी. २३
जया वर्णिती वेद शास्त्रें पुराणें;
जयाचेनि योगें समाधान होणें,
तयालागीं हें सर्व चांचल्य दीजे,
मना सज्जना राघवीं वृत्ति कीजे. २४
मना रे जनीं मौन्यमुद्रा धरावी,
कथा आदरें राघवाची करावी;
नसे राम तें धाम सोडोनि द्यावें,
सुखालागिं आरण्य सेवीत जावें. २५
सदा देवकाजीं झिजे देह ज्याचा,
सदा रामनामीं वदे नित्य वाचा,

स्वधर्मेंचि चाले, सदा उत्तमाचा,
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा. २६
सदा बोलण्यासारिखें चालताहे,
अनेकीं सदा एक देवासि पाहे,
सगूणीं भजे, लेश नाहीं भ्रमाचा,
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा. २७
मदें मत्सरें सांडिली स्वार्थबुद्धी,
प्रपंचीक नाहीं जयातें उपाधी;
सदा बोलणें नम्र वाचा सुवाचा,
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा. २८
सदा सेवि आरण्य तारुण्यकाळीं
मिळेना कदा कल्पनेचेनि मेळीं;
चळेना मनीं निश्चयो दृढ ज्याचा,
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा. २९
जया अंतरीं क्रोध संताप कैंचा

जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा;
दिनाचा दयाळू मनाचा मवाळू
स्नेहाळू कृपाळू जगीं दासपाळू. ३०

नव्हे सार संसार, हा घोर आहे,
मना सज्जना सर्व शोधोनि पाहे;
जनीं वीष खातां पुढें सौख्य कैचें?
धरीं रे मना ध्यान या राघवाचें. ३१

बळें आगळा राम कोदंडधारी,
महाकाळ विक्राळ तोही थरारी;
पुढें मानवा किंकरा कोण केवा,
प्रभाते मनीं राम चिंतीत जावा. ३२

सुखानंदकारी निवारी भयातें,
जनीं भक्तिभावें भजावें तयातें;
विवेकें त्यजावा अनाचार हेवा,
प्रभाते मनीं राम चिंतीत जावा. ३३

जयाचेनि नामें महा दोष जाती,
जयाचेनि नामें गती पाविजेती,
जयाचेनि नामें घडे पुण्यठेवा,
प्रभाते मनीं राम चिंतीत जावा. ३४
न वेंचे कदा ग्रंथिचा अर्थ कांहीं,
मुखें नाम उच्चारितां कष्ट नाहीं;
महा घोर संसार शत्रू जिणावा,
प्रभाते मनीं राम चिंतीत जावा. ३५
बहुतांपरी संकटें साधनांचीं,
व्रतें दान उद्यापनें तीं धनाचीं;
दिनाचा दयाळू मनीं आठवावा,
प्रभाते मनीं राम चिंतीत जावा. ३६
समस्तांमध्यें सार साचार आहे,
कळेना तरी सर्व शोधोनि पाहें;
मना संशयो वाउगा तो त्यजावा,

प्रभाते मनीं राम चिंतीत जावा. ३७
मुखीं राम त्या काम बाधूं शकेना,
गुणीं इष्ट धारिष्ट त्याचें चुकेना;
हरीभक्त तो शत्रुकामासि मारी,
जगीं धन्य तो मारुती ब्रह्मचारी. ३८
जनीं भोजनीं नाम वाचे वदावें,
अती आदरें नाम घोषें ह्मणावें;
हरीचिंतनीं अन्न सेवीत जावें,
तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावें. ३९
जगीं पाहतां राम हा अन्नदाता,
तयालागिं हो तत्वता सार चिन्ता;
तयाचें मुखीं नाम घेतां फुकाचें,
मना सांग पां रे तुझें काय वेंचे? ४०
यथा सांग रे कर्म तेंही घडेना,
घडे कर्म तें पुण्य गांठीं पडेना;

दया पाहतां सर्व भूतीं असेना,
फुकाच मुखीं नाम तेंही वसेना. ४१
क्रियेवीण नानापरी बोलिजेतें,
परी चित्त दुश्चित्त तें लाजवीतें;
मना कल्पना धीट सैराट धांवे,
तया मानवा देव कैसोनि पावे. ४२
विवेकें क्रिया आपुली पालटावी,
अती आदरें शुद्ध क्रीया धरावी;
जगीं बोलण्यासारिखें चाल बापा,
मनीं कल्पना सोड संसारतापा. ४३
सदा सर्वदा सज्जनाचेनि योगें,
क्रिया पालटे, भक्तिभावार्थ लागे;
क्रियेवीण वाचाळता ते निवारी,
तुटे वाद, संवाद तो हीतकारी. ४४
तुटे वाद, संवाद तेथें करावा,

विवेकें अहंभाव हा पालटावा;
जनीं बोलण्यासारिखें आचरावें,
क्रियापालटें भक्तिपंथेंचि जावें. ४५

फुकाचें मुखीं बोलतां काय वेंचे?
दिसंदीस अभ्यंतरीं गर्व सांचे;
क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे,
विचारीं मना तूंचि शोधूनि पाहें. ४६

अनाथा दिनांकारणें जन्मताहे,
कलंकी पुढें देव होणार आहे;
तया वर्णितां शीणली वेदवाणी,
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी. ४७

जना कारणें देव लीलावतारी,
बहूतांपरी आदरें वेषधारी;
तया नेणती ते जनीं पापरूपी,
दुरात्मे महा नष्ट चांडाळ पापी. ४८

दिसेना जनीं तेंचि शोधोनि पाहें,
बरें पाहतां गूज तेथेंचि आहे;
करें घेउं जातां कदा आकळेना,
जनीं सर्व कोंदाटलें तें कळेना. ४९

ह्मणे जाणता तो मनीं मूर्ख आहे,
अतर्क्यासि तर्कीं असा कोण आहे?
जनीं मीपणें पाहतां पाहवेना,
तया पाहतां वेगळें राहवेना. ५०

जेणें मक्षिका भक्षिली जाणिवेंची,
तया भोजनाची रुची प्राप्त कैंची;
अहंभाव ज्या मानसींचा विरेना,
तया ज्ञान हें अन्न पोटीं जिरेना. ५१

फुटेना तुटेना कदा देवराणा,
चळेना ढळेना कदा दैन्यवाणा;
कळेना वळेना कदा लोचनासी,

असेना दिसेना जना मीपणासीं. ५२
जया मानला देव तो पूजिताहे,
परी देव शोधोनि कोणी न पाहे;
जगीं पाहतां देव कोट्यानुकोटी,
जया मानली भक्ति जे तेचि मोठी. ५३
तिन्ही लोक जेथूनि निर्माण झाले,
तया देवरायासि कोणी न बोले;
जगीं थोरला देव तो चोरिलासे,
गुरूवीण तो सर्वथाही न दीसे. ५४
गुरू पाहतां लक्ष कोट्यानुकोटी,
बहूसाल मंत्रावळी शक्ति मोठी;
मना कल्पना चेटकें घातपाता,
जनीं व्यर्थ रे तो नव्हे मुक्तिदाता. ५५
नव्हे चेटकू चाळकू द्रव्यभोंदू,
नव्हे निंदकू मत्सरू भक्तिमंदू;

नव्हे उन्मतू व्यसनी संग बाधू,
जनीं ज्ञानिया तोचि साधू अगाधू. ५६
नव्हे वाउगी चावटी काम पोटीं,
क्रियेवीण वाचाळता तेचि मोटी;
मुखीं बोलिल्यासारिखें चालताहे,
मना सद्गुरू तोचि शोधूनि पाहे. ५७
वसे हृदयीं देव तो जाण ऐसा,
नभाचे परी व्यापकू सर्व तैसा;
सदा संचला येत ना जात कांहीं,
तयावीण कोठें रिता ठाव नाहीं. ५८
मनासारिखें रूप या राघवाचें,
मनीं चिन्तितां मूळ तुटे भवाचें;
तया पाहतां देहबुद्धी उरेना,
सदा सर्वदा आर्त पोटीं पुरेना. ५९

# रामदासी ओंव्या.

आपण यथेष्ट जेवणें । उरलें अन्न तें वांटणें ।
परंतु वायां दवडणें । हा धर्म नव्हे १
तैसें ज्ञानीं तृप्त व्हावें । तेंचि ज्ञान जगासि सांगावें ।
तरतें बुडों न द्यावें । बुडतयासी २
उत्तम गुण स्वयें घ्यावे । ते बहुतांस सांगावे ॥
वर्तल्याविण बोलावे । ते शब्द मिथ्या ३
स्नान संध्या देवतार्चन । एकाग्र करावें जपध्यान
हरिकथानिरूपण ॥ केलें पाहिजे ४
शरीर परोपकारीं लावावें ॥ बहुतांच्या कार्यास यावें ॥
उणें पडों न द्यावें ॥ कोणा एकाचें ५
अडलें गांजलें जाणावें ॥ यथाशक्ति कामास यावें ॥
मृदुवचन बोलत जावें ॥ कोणा एकासी ६
दुसऱ्याचे दुःखें दुःखी व्हावें । पर संतोषें सुखी व्हावें ।

प्राणिमात्रास मेळवून घ्यावें । बरव्या शब्दें ७
बहुतांचे अन्याय क्षमावे । बहुतांचे कार्यभाग करावे ।
आपल्यापरी व्हावे । पारिखे जन ८
दुसऱ्याचें अंतर जाणावें । तदनुसारचि वर्तावें ।
लोकांस परीक्षीत जावें । नाना प्रकारें ९
नेमकेंचि बोलावें । तात्काळचि प्रतिवचन द्यावें ।
कदापि रागा न यावें । क्षमारूपें १०
आळस अवघाच दवडावा । यत्न उदंडचि करावा ।
शद्बमत्सर न करावा । कोणी एकाचा ११
उत्तम पदार्थ दुसऱ्यास द्यावा । शब्द निवडून बोलावा ।
सावधपणें करीत जावा । संसार आपुला १२
मरणाचें स्मरण असावें । हरिभक्तीसि सादर व्हावें ।
मरोन कीर्तीस उरावें । येणें प्रकारें १३
नेमकपणें वर्तो लागला । तो बहुतांस कळों आला ।
सर्व आर्जवो तयाला । काय उणें १४

ऐसा उत्तमगुणीं विशेष । तयास ह्मणावें पुरुष ।
जयाच्या भजनें जगदीश । त्रस्त होय १५
उदंड धिःकारून बोलती । तरी चळों न द्यावी शांती ।
दुर्जनासि मिळोन जाती । धन्य ते साधू १६
उत्तम गुणीं शृंगारिला । ज्ञानवैराग्यें शोभला ।
तोचि एक जाणावा भला । भूमंडळीं १७
स्वयें आपण कष्टावें । बहुतांचें सोशीत जावें ।
झिजोन कीर्तीशि उरवावें । नाना प्रकारें १८
कीर्ति पांहूं जातां सुख नाहीं । सुख पाहतां कीर्ति नाहीं ॥
विचारेंविण कोठेंचि नाहीं । समाधान १९
परांतरास न लावावा ढका । कदापि पडों न द्यावा चुका ।
क्षमाशीळें तयाचा तुका । कोण नाहीं २०
आपलें अथवा परावें । कार्य अवघेंचि करावें ॥
प्रसंगीं कामास चुकावें । हें विहित नव्हे २१
बरें बोलतां सुख वाटतें । हें तों प्रत्यक्ष कळतें ॥

आत्मवत्परावेंतें । मानीत जावें २२
कठिण शब्दें वाईट वाटतें । हें तों प्रत्ययास येतें ॥
तरी मग वाईट बोलावें तें । काय निमित्त २३
आपणास चिमोटा घेतला । तेणें कासावीस झाला ॥
आपणावरून दुसऱ्याला । राखीत जावें २४
जे दुसऱ्यास दुःख करी । ते अपवित्र वैखरी ॥
आपणास घात करी । कोणी एके प्रसंगीं २५
पेरिलें उगवतें । बोलण्या सारिखें उत्तर येतें ॥
तरी मग कर्कश बोलावें तें । काय निमित्त २६
आपुल्या पुरुषार्थवैभवें । बहुतांस सुखी करावें ॥
परंतु कष्टी करावें । हे राक्षसी क्रिया २७
दंभ दर्प अभिमान । क्रोध आणि कठिण वचन ॥
हें अज्ञानाचें लक्षण । भगवद्गीतेंत बोलिलें २८
जो उत्तमगुणें शोभला । तोचि पुरुष महा भला ॥
कित्येक लोक तयाला । शोधित फिरती २९

क्रियेवीण शब्दज्ञान । तेंचि श्वानाचें वमन ॥
भले तेथें अवलोकन । कदापि न करिती ३०
मनापासून भक्ति करणें । उत्तम गुण अगत्य धरणें ॥
तया महापुरुषा कारणें । धुंडित येती ३१
ऐसा जो महानुभाव । तेणें करावा समुदाव ॥
भक्तियोगें देवाधिदेव आपुला करावा ३२
आपण अवचित मरोन जावें । मग भजन कोणें करावें ॥
याकारणें भजनास लावावे बहुत लोक ३३
१० समा० १२ दशक० दासबोध.

# टिपा.

१ 'सज्जना'—'मना'चें विशेषण. 'भक्तिपंथें'—भजनाच्या मार्गानें. 'स्वभावें'—सहज, अनायासें. 'जनीं'—चांगल्या लोकांमध्यें. रामदासस्वामी सावधान होण्याचे पूर्वी पळून गेले तेव्हां वाईट लोकांनीं

जरी त्यांस बोल लाविलेला असला, तरी चांगल्या लोकानीं लाविलेला असण्याचा संभव नाहीं. ३ 'दुष्टवासना,' दुर्वासना. 'कामा नये '—कामास येत नाहीं, अखेरीस फायदेशीर होत नाहीं. 'नीति '—रामदासासारख्या किंवा एकनाथासारख्या सत्पुरुषानें दाखविलेला मार्ग देवास भ्यावें, खोटें बोलूं नये वगैरे शिष्टांनीं घातलेला मार्ग. 'सर्वथा '—कधींही, प्राणांतींही. 'सार '—चांगला, ज्यापासून उत्तम गति मिळेल असा.

२ 'प्रभाते '—सकाळीं. 'वैखरी '—बोलणें, वाणी. 'हा सदाचार '—सकाळीं पहिल्यानें देवाचें चिंतन करण्याचा 'उत्तम आचार.' 'तोचि तो '—जो वरील 'सदाचार' सोडीत नाहीं तोच. 'मानवी '—मनुष्य.

५ 'श्रेष्ठ '—प्राणांतींही न चळणारें. 'धारिष्ट '—धैर्य. 'निंदकांचें '—या अध्याहृत शब्दाशीं

'बोलणें' शब्दाचा अन्वय.

४ 'नम्रवाचे'—नम्रतेच्या वाणीनें. 'संकल्प,—(खोट्या) मार्गानें जाण्याचा निश्चय. 'सत्यसंकल्प'—खऱ्या मार्गानें जाण्याचा निश्चय. 'कल्पना'—वासना. 'वीषयाची'—विषय सुखाची, केवळ खाण्यापिण्यांत आयुष्य घालविण्याची. 'विकारें'—केवळ खाण्यापिण्यांत आयुष्य घालविण्याच्या 'वासनेनें.' खाण्यापिण्याच्या पाशांत मनुष्य पडला ह्मणजे पैशासाठीं अनेक पापें करण्यास चुकत नाहीं व शेवटीं 'छी छी घडे'—लोक त्याच्या तोंडावर थुंकतात.

६ आपलें नांव पाठीमागें रहावें, ह्मणून सत्कर्म करून आयुष्य घालवावें व चांगल्या लोकांकडून वहावा मिळवावी, हा भावार्थ.

७ 'सांड धरावी'—लक्ष पोंचवूं नये, बेपर्वा असावें. 'विवेकें'—देवास ओळखून, देव सर्वव्यापी आ-

हे ही गोष्ट लक्षांत ठेवून पापाकडे मन जाऊं न देतां. ' स्वस्वरूपीं '—आपला जीवात्मा ज्याच्या स्वरूपाच्या प्रतिबिंबासारखा त्या परमात्म्यास.

८ ' पूर्वसंचित '—पूर्वीच्या जन्मांतील पुण्यपाप. पूर्वीच्या जन्मीं पाप करितो ह्मणून या जन्मीं दुःखी होतो. ह्मणून आपल्या दुःखाबद्दल देवास दोष लावूं नये तर त्याची भक्ति करून त्याच्यावर सर्वस्वी भरंवसा ठेवावा.

९ रावणानें पुष्कळ पाप केलें ह्मणून सगळें राज्य बुडालें, हा भावार्थ. ' कुडी '—खोटी, पापाची. ' काळ '—मृत्यु.

१० 'कर्मयोगें'—पूर्वीच्या जन्मीं केलेल्या कर्मामुळें. ' महाथोर '—कृष्णासारखे किंवा शंकराचार्यांसारखे किंवा ज्ञानेश्वर, शिवाजी यांच्या सारखे. ' पंथें '—वाटेनें. 'असंख्यात '—गणती नाहीं इतके पुष्कळ.

११ 'जितां'—जिवंत आहेत तोंपर्यंत. 'चिरंजीव'—'जगाचा शेवट होईपर्यंत आपण वांचणारे' असें.

१२ 'लोभ पुरत नाहीं'—देवावर सर्वस्वीं भार न पडल्यामुळें 'हेतु रहातो' आणि हेतु राहिल्यामुळें पुनः जन्मावें लागतें. देवावर सगळा भार टाकून शेवटीं हेतूस फांटा दिला आणि देवाच्या स्वाधीन आत्मा केला ह्मणजे पुनर्जन्म नाहीं.

१३ 'मिथ्य'—विनाकारण; जर आपला पक्ष रास्त आहे, तर भांडणें वाजवी होईल.

१४ 'बोलण्याचा'—'चांगल्या लोकांच्या' किंवा 'आईबापांच्या' हे शब्द अध्याहृत.

१५ यज्ञयागादि कर्मकांडाकडे लक्ष न पोंचवितां, केवळ भक्तीकडे व देवाकडे लक्ष पोंचविण्यास 'समर्थ' सांगतात. यज्ञयागादिक करणारांस पुनर्जन्म आहे,

पण भक्तास पुनर्जन्म नाहीं, हा हिंदु धर्माचा एक मोठा सिद्धान्त. 'अंतरीं'—मनांत, मनांतील. 'भवाची'—संसाराची.

१६ 'दिनानाथ'—दीनांचा नाथ. 'कोदंडधारी'—दुष्टांस व अभक्तांस शिक्षा करून सन्मार्गावर आणण्यासाठीं 'धनुष्य धारण करणारा.' 'नेमस्त'—बेताचें, लांबलचक नव्हे असें. 'दासाभिमानी'—भक्तांचा अभिमान बाळगणारा, भक्तांचा पाठीराखा.

१७ 'समर्थाचिया'—राजाच्या किंवा राजांचा राजा जो देव त्याच्या. 'सेवका'—कामगिरी नीट बजाविणाऱ्या चाकरास किंवा मनापासून निष्काम भक्ति करणाऱ्या भक्तास. 'वक्र'—वांकडें, रोषानें किंवा रागानें. 'तिन्ही लोक'—पाताळ, पृथ्वी व स्वर्ग या तीन भुवनांत राहणारे प्राणी.

१८ 'महासंकटीं'—इंद्रादिकांवर रावणादिकांमुळें मोठीं

मोठीं संकटें कोसळलीं असतां. ‘ आगळा ’—अधिक. ‘ शैलजा ’–हिमालय पर्वतापासून उत्पन्न झालेली पार्वती. ‘शूलपाणी’–शूळ हातांत ज्याच्या तो. शंकर-पार्वती रामनामाचा जप चालवितात, असें ह्मणतात.

१९ रामाच्या पायांचा स्पर्श होतांच शिळा होऊन पडलेली गौतम ऋषीची बायको अहल्या पूर्ववत् स्त्री झाली. अहल्येनें पाप केल्यामुळें, गौतम ऋषीनें संतापून‘ शिळा हो ’ असा तसि शाप दिला आणि लागलीच अहल्या शिळा झाली. ‘वेदवाणी ’–वेदही अखेरीस थकून देवाची ओळख आपणांस करून देतां येत नाहीं, असें उघड ह्मणाले. देवाची ओळख वेदांच्याही वरची भक्तिमात्र नीट करून देऊं शकते.

२० ‘ मेरुमांद्गार ’—हे दोन फार उंच असे पुराणांतील पर्वत. ‘ तारांगणें ’—नक्षत्रांच्या माळा. या प्रचंड व भव्य दिसणाऱ्या सगळ्या सृष्टीस अंत

आहे, पण देवाच्या निःसीम भक्तास नाहीं; उदाहरणार्थ मारुति व बिभीषण.

२१ 'अल्प धारिष्ट पाहे'–(आमच्यावर विपत्ति येते तेव्हां आमची त्याच्यावरील) भक्ति थोडी कसास लावून पहातो. 'सन्निध'—जवळ. 'सुखानंद'–सुखानें व आनंदानें भरलेला परमेश्वर. 'आनंद' व मोक्ष हीं दोन भक्तांस देण्यांत. 'नुपेक्षी'—आळस करीत नाहीं.

२२ 'अनन्यासि'–निःसीम भक्ति करणारास. 'चाप'–धनुष्य.

२३ चक्रवाक एका तीरावर व चक्रवाकी दुसऱ्या तीरावर, अशी रात्रीं स्थिति होते; पण सूर्य उगवतांच तीं उभयतां एकमेकांस भेटतात. 'निशाण'–मुक्तिरूपी. देवाची भक्ति हीच कुऱ्हाड, हिचा घाव घालून मुक्तिरूपी निशाण आपलेंसें कर.

२४ 'चांचल्य'–मनाचा चंचलपणा. 'दीजे'–सोड.

२५ 'धाम'—घर. जर घरीं देवाचें नांवही नाहीं, तर तें घर सोडून द्यावें.

२६ 'देवकाजीं'—लोकांस उपदेश करून देवाकडे वळविण्याचें व चांगलें उदाहरण घालून ठेवण्याचें जें मोठें काम तें. 'स्वधर्में'—ज्या नांवानें व ध्यानानें देवाची भक्ति करण्याचा कुळसंप्रदाय असेल त्या संप्रदायाप्रमाणें. 'उत्तमा'चा—सत्पुरुषाचा. 'चाकर' शब्द अध्याहृत.

२७ बोलणें निराळें, चालणें निराळें, असला दांभिक नव्हे; तर बोलण्या प्रमाणें चालणारा. जर चालतां येत नाहीं, तर रिकामी वटवट करीत बसूं नये. 'अनेकीं'—राम, कृष्ण, विठोबा, दत्त, हीं नांवें व ध्यानें जरी बाहेरून भिन्न दिसलीं, तरी तीं एकाच दे-

वाचीं जो समजतो. ‘ सगूणीं ’—निराकाराच्या भक्तीचा आव घालून लोकांस फसवितां सगुणोपासनेनें अस्तित्वांत आणलेल्या रामाच्या, कृष्णाच्या, विठोबाच्या किंवा असल्याच ‘ सगुण रूपास. ’

२८ ‘ मदें मत्सरें ’—मद व मत्सर यांसहित. ‘ स्वार्थबुद्धि ’—आपलाच मतलब साधून घेण्याची वासना. ‘ प्रपंचीक ’—संसारसंबंधी. ‘ उपाधी ’—खटपट. संसार करीत असला, तरी ज्यास संसारांत विशेष आनंद न वाटतां, देवाच्या भक्तींतच विशेष आनंद वाटतो. ‘ सुवाचा ’—गोड वाणी.

२९ ‘ अरण्यसेवी ’—डोळ्यांवर धुंदी येऊन देवास विसरत नाहीं. ‘ कल्पनेचिनि ’—मनोराज्याच्या ‘ मेळीं ’—भानगडींत. ‘ मिळेना ’—पडेना.

३० ‘ दिनांचा ’—अनाथांचा. ‘ मवाळू ’—मऊ. ‘ दासपाळू ’—चाकरांवर ममता करणारा. ३१ ‘ घो-

र '–भयंकर. ३२ 'आगळा '–अधिक, मोठा. 'कोदंड'–धनुष्य. 'महाकाळ '—मृत्यु, 'केंवा'?– 'प्रभाते '–सकाळीं.

३३ 'सुखा० '–सुख व आनंद देणारा. 'अनाचार '–[ देवाचें नांव न घेणें, आईबापाची आज्ञा मोडणें वगैरे ] 'वाईट खोडी.' 'हेवा '—दुसऱ्याचें बरें पाहून वाईट वाटणें. 'विवेक '—विचार, पोक्तपणा. ३४ 'गति '–उत्तम गती.

३५ 'ग्रंथिंचा '—गांठचा. 'अर्थ '—पैसा 'जिणावा '—जिंकावा.

३६ 'साधनांची '—जप, पुरश्चरण असल्या साधनांची. 'व्रतें '—अमुक खाईन किंवा खाणार नाहीं असा केलेला निश्चय. 'दान '–ब्राह्मणांस किंवा ब्राह्मणेतरांस दिलेले पदार्थ. 'उद्यापनें '—व्रताची समाप्ति. ही सगळी खटपट सोडून, नुसत्या देवाच्या नांवानेंही

काम होतें, हें तात्पर्य.

३७ 'साचार'—खरोखर 'समस्तांमध्यें'—सगळ्या धर्मांमध्यें किंवा जातींमध्यें. 'सार'—चांगुलपणा. 'वाउगा'—विनाकारण, खोटा. ३८ 'काम'—शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध, या पांच विषयांची वासना. 'गुणीं'—चांगल्या गुणांविषयीं; 'बोले तैसा चाले' याच्यासारखे गुण 'चांगले गुण.'—'इष्ट'—ज्याची प्रत्येकास इच्छा असते तें. 'धारिष्ट'—दम, अवसान. 'चुकेना'—भंगत नाहीं. 'ब्रह्मचारी'—विषयांची पर्वा न करितां किंवा विषयांकडे लक्ष न पोंचवितां केवळ देवाप्रीत्यर्थ ह्मणुन आयुष्य खर्ची घालणारा. ३९ 'साजिरें'—सुरेख, गोड. 'स्वल्प'—लहान. 'सोपें'—वेदाच्या मंत्रासारखें गहन नव्हे असें. 'फुकाचें'—यज्ञास किंवा ब्राह्मणभोजनास पैसे लागतात तसे हें घेण्यास लागत नाहींत. 'मूळ निर्मूळ करी'—पलीकड-

च्या तीरीं नेतें. 'जिवा'—जिवंत. 'कैवल्य'—मोक्ष. 'साचें'—खरें. ४० 'तयालागीं'—त्याच्यासाठीं. 'तत्त्वता'—खरोखरी. 'सार'—अतिशय. 'हो'—होवो, असो. अन्नदाता देव, तर त्याची मात्र पुष्कळ आठवण ठेव.

४२ 'क्रियेवीण'—करून दाखवीत नाहीं असें. 'बोलिजेतें'—बोलिलें जातें. 'दुश्चित्त'—वाईट; बोलल्याप्रमाणें करूं न देणारें. 'सैराट'—हवी तेथें किंवा बेफाम, अमर्याद. 'धीट'—दांडगी. 'देवाविषयीं अनेक कुतर्क चालविणारी' हा भावार्थ.

४१ 'यथासांग'—शास्त्रांत सांगितल्याप्रमाणें. 'दया पाह०'—आपले सगेसोयरे किंवा जातीचे यांचा पक्षपात करितो व सर्वांवर सारखी दृष्टि ठेवीत नाहीं, हा भाव. ४३ 'संसारतापा'—संसारांत ताप जिच्यापासून होतो ती ४४ 'वाद'—सर्व प्रकारचा संशय किं-

या भ्रम. 'तुटे'—तुटतो, नाहींसा होतो. 'हीतकारी'—कल्याण करणारा. ४९ 'अहंभाव'—अहंकार, मीपणा, स्वतःची थोरवी. ४६ 'दिसंदीस—दिवसो दिवस. 'अभ्यंतरीं'—मनामध्यें.

४७ 'जन्मताहे'—अवतार घेतो. 'कलंकी'—दशावतारांतील दहावा अवतार. आजपर्यंत अनेक अवतार होऊन गेले व पुढेंही होतील, त्यांमध्यें विष्णूचे दहा विशेष प्रसिद्ध आहेत. 'वेदवाणी शीणली;'—कारण केवळ यज्ञयागादिक करावयास सांगते व देव हवा असल्यास भक्तिच केली पाहिजे. देव, कर्मकांडाच्या पलीकडे असून केवळ कर्मठांस त्याची ओळख नसते, हा भावार्थ.

४८ 'वेषधारी'—निरनिराळा वेष धारण करणारा. ज्या लोकांमध्यें अवतार घेतो, त्या लोकांचा वेष देव धारण करितो ४९ 'गूज'—गुह्य. हा आणि ५०वा या दोन श्लोकांत देवाचें स्वरूप सुरेख वर्णिलें आहे. ५०

'वेगळें राहवेना '—तन्मय व्हावें लागतें, भान नाहींसें होतें. ९१ 'मक्षिका '—माशी. 'जाणिवेंचि'—जाणून बुजून. 'ज्ञान '—देवाच्या संबंधाची माहिती. ९२ 'दैन्यवाणा '—दैन्ययुक्त. ९३ निरनिराळ्या उपास्यांमध्यें भेद मानूं नये, तर सगळीं ध्यानें आणि नांवें, एकाच देवाचीं समजावीं, हे तात्पर्य. ९४ 'देवरायासि '—देवांच्या राजास; इंद्रादिक देवही ज्यास विपत्कालीं शरण जातात त्या 'देवाच्याही देवास.'—'गुरु '—ज्ञानेश्वर, एकनाथ, रामदास, तुकाराम यांच्यासारखे; आज अनेक ढोंगी किंवा पैसा उपटणारे आढळतात तसले नव्हत.

९५ 'मंत्रावळी '—उपदेश करण्याचे शेंकडो मंत्र 'आवली '—पंक्ति. 'चेटकें '—मारण किंवां उच्चाटन करणें. 'घातपाता'—घात व 'पात'—ह्मणजे 'अधःपात हीं दोन फळें मिळतात. ९६ 'चेटकू '—मारण उच्चाटण करणारा. 'चाळकू '—वेड लावणारा.

'भक्तिमंदू'—देवाच्या ठिकाणीं भक्ति नाहीं असा. 'उन्मत्तू'—कैफी किंवा अमली. 'व्यसनी'—तंबाकू वगैरे ओढणारा किंवा चघळणारा. 'संगबाधू'—( शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध, या पांच विषयांच्या ) 'संगानें बिघडलेला.' 'ज्ञानिया'—ज्ञानी. 'अगाधू'—खोल.

९७ 'वाउगी'—वायफळ. 'चावटी'—बडबड; 'ज्यांस नव्हे'—नाहीं, व 'काम पोटीं' ज्याच्या नाहीं; व 'क्रियेशिवाय'—जी मोठी वाचाळता तेही ज्यास 'नाहीं.'

९८ 'नभाचे'—आकाशाचे. 'परि'—प्रमाणें 'संचला'—रहाणारा. 'रिता'—शून्य.

९९ 'मनासारखें'—मनास आवडेल असें, अतिसुरेख. 'देहबुद्धि'—देहाचें भान. 'आर्त'—कोड, कौतुक.

# ओंव्याच्या टिपा.

१ 'यथेष्ट'—पोटभर. २ 'तरतें'—तरणारातें. ४ 'जप'—मानसिक प्रार्थना. 'हरिकथा'—कीर्तन; 'निरूपण'—ऐकणें. ८ 'क्षमावे'—क्षमा करावे, सोसावे. 'पारिखे'—परके, अनोळखी. ९ 'परिक्षीत'—पारखीत, ओळखीत. १४ 'नेमकपणें'—न वहकतां. १६ 'दुर्जनासि मिळों न जाती'—दुर्जनाशीं मिलाफ ठेवीत नाहींत, दुर्जनासारखे वागत नाहींत.

२० 'परांतरास'—परक्याच्या मनास. 'ढका'—चटका, धक्का. दुसऱ्याचा 'चुकाही पडों न द्यावा'—काडीभरही नुकसान होऊं देऊं नये. 'क्षमाशीळें'—क्षमावंतानें. 'तुका'—तुलना. 'कोणा'—कोणासही. २१ 'परावें'—परक्याचें. 'प्रसंगीं'—प्रसंग पडतो तेव्हां. 'कामास'—(दुसऱ्याच्या) 'विहित' योग्य, वाजवी. २४ 'चिमोटा'—चिमटा. २९ 'वैखरी'—वाचा, वाणी. ३२ 'समुदाव'—[लोकांचा] जमाव. 'महानुभावे'—मोठा पराक्रमी; रामदासासारखा किंवा तुकारामासारखा.

# प्रस्तावना

रामदास स्वामीचें, आईबापांनीं ठेविलेलें नांव नाराय-ण. नारायणाचा जन्म शालि० शके १५३० या वर्षी रामनवमीस झाला. नारायणाच्या आईचें नांव राणूबाई व बापाचें नांव सूर्याजीपंत. गोदावरीच्या उत्तरतीरावर जांब नांवाच्या गांवचा सूर्याजीपंत हा कुळकरणी. नाराय-णाचा वडील बंधू गंगाधर, हा नारायणापेक्षां ३ वर्षांनीं मोठा. महाराष्ट्रमंडळांतील लोकांमध्यें अज्ञान मस्त माजलें व देवाचा विसर पडत चालला, असें पाहून सर्वांस ताळ्यावर आणण्यासाठीं नारायण आणि तुकारा-म हे दोन अवतारी पुरुष एकाच काळीं जन्मास आले. महाराष्ट्रमंडळांतील महारांचा उद्धार करण्यासाठीं अव-तार धारण केलेल्या एकनाथानें या दोन्ही संतशिरोमणीं-चा रस्ता पुष्कळ उजू व सोपा करून ठेविला होता. एकनाथ दत्ताचा निःसीम भक्त होता. नारायणाच्या लग्नाचा घाट आईबापांनीं घातला होता. पण देवाची दिशा दाखविण्यासाठीं जन्मलेल्या नारायणास तो पसंत पडला नाहीं. सावधान होण्याची घटिका आली असें

पाहून नारायणानें पोबारा केला आणि रामाची भक्ति चालविली. पुढें नारायण "रामदास" या नांवानें नांवाजला. शिवाजी जसा तुकारामास तसाच रामदासास शरण गेला होता. संसार न सोडतांही महारांसारख्या अति निकृष्ट लोकांच्या आध्यात्मिक व भौतिक कल्याणा-साठीं देह झिजवून देवाची मर्जी संपादन करितां येते, हा एक आमच्या उत्तमोत्तम धर्माचा महासिद्धांत एक-नाथानें आपल्या देशबांधवांस कळविला. लोकांच्या आध्यात्मिक व भौतिक कल्याणाच्या उद्देशानें प्रसंगीं आईबापाच्याही वचनाचा अतिक्रम करून, एकव्या देवास शरण जाण्याचा व सर्वस्वीं भरंवसा त्याच्यावर टाकण्या-चा अत्युत्तम मार्ग रामदासानें दाखविला. जसें दत्ताचें नांव घेऊन व ध्यान करून एकनाथ कृतकृत्य झाला, तसें रामाचें नांव घेऊन व ध्यान करून रामदास कृतकृत्य झाला. तुकारामानें तर विठोबाचें नांव घेऊन व ध्यान करून कृतकृत्यता संपादन केली. सारांश दत्त, राम, व विठोबा हीं एकाच देवाचीं नावें व ध्यानें होत. नें

नांव आवडेल व जें ध्यान पसंत पडेल त्याच्या आश्रयानें, कोणीही शरण गेल्यास परम कारुणिक देव निःसंशय अव्हेर करणार नाहीं. इतकेंच कीं शरण जाणें मनापासून झालें पाहिजे, तें लोकांस केवळ दाखविण्याच्याच हेतूनें होतां कामा नये, व जें नांव घ्यावयाचें किंवा ध्यान करावयाचें त्याच्यावर ऐकांतिक निष्ठा हवी. ती ऐकान्तिक निष्ठा असली, ह्मणजे एकत्र्या देवाकडे मन वळून ऐहिक गोष्टींकडे तें बिलकूल जात नाहीं व 'क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे' हें मोठें तत्त्व मनोमय आरशांत सुरेख प्रतिबिंबतें.

सारें आयुष्य लोकांस सन्मार्गाकडे वळविण्यांत खर्च करून शालि० शके १६०३ माघ वद्य नवमी या संकीर्तनीय दिवशीं रामदास स्वामी आपले वयाचे ७४वे वर्षीं समाधिस्थ झाले.

या अवतारी पुरुषाच्या ग्रंथांतून हे पुढील वेंचे इंग्रजी पहिल्या यत्तेंतील मुलांसाठीं निवडून काढिले आहेत.

अल्प किंमतीची देशी वाचन माला.

# ३—रामदासी वेंचे.

मुंबईंत

“ ब्राह्मण ” छापखान्यांत छापिलें.

पौष शुद्ध १० शालिवाहन शके १८१४.

[ इसवी सन १८९३ ]

किंमत १॥ आणा, ट. हां. अर्धा आणा.